प्रस्तावना:-

**विषय:-. प्रभाग समिती ०५ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणे.**

मे.सादर,

**प्रभाग समिती ०५ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणे रक्कम रु. ३५,९५,३५०/-** -मात्रच्या प्रस्तावास मा. आयुक्त सो यांची मंजुरी प्राप्त झाली असुन उक्त कामास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. **३५,९५,३५०**/-ई-निविदा सुचना क्र. २७/११०६२३१४ (२०२४-२५) दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.३१/०७/२०२४ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी निविदाकारांची नावे निविदेतील दर एकुण **२ निविदाकार** खालील प्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | निविदाकार | दर |
|---|---|---|
| **१** | **मे झा.पी ॲण्ड कंपनी** | **अंदाजपत्रकीय दराने** |
| २ | मे.साई एस.एस.के ईन्स्फास्ट्रक्चर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०० टक्के जादा दराने |

वरील पैकी **मे झा.पी ॲण्ड कंपनी** यांची अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच रक्कम रु. **३५,९५,३५०/-** (अक्षरी पत्तीस लक्ष पंचाण्णव हजार तीनशे पन्नास मात्र ) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.: - ५23 दिनांक :-09/09/2024

**मे झा.पी ॲण्ड कंपनी** यांची अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच रक्कम रु. **३५,९५,३५०/-** (अक्षरी पत्तीस लक्ष पंचाण्णव हजार तीनशे पन्नास मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी **अजय वैद्य**, प्रशासक तथा आयुक्त **प्रभाग समिती ०५ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती** करणेकामी अंदाजपत्रकीय दराचे निविदाकार **मे झा.पी ॲण्ड कंपनी** यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका